# मुख्य वनसंरक्षक(प्रादेशिक), कोल्हापूर यांचे कार्यालय

" वनवर्धन ", प्रधान डाकघरासमोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.

☎कार्यालय-०२३१/२६५३६३२, निवास-२६५३६३४, फॅक्स-२६५९२३३ E-mail-ccftkolhapur@gmail.com


**पत्र :**

क्र.: कक्ष-४-४/आस्था/जे.सु.१४/२२०८
कोल्हापूर - ३.दिनांक :- ३/७/२०१४

प्रति,
महासंचालक,कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल
मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), कोल्हापूर
उपवनसंरक्षक, कोल्हापूर/सातारा/सावंतवाडी
विभागीय वन अधिकारी, सांगली
उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
कोल्हापूर/सातारा/सागंली/रत्नागिरी/सिंधुदूर्ग.

विषय - वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाकडील " पहारेकरी " या संवर्गाची दि. १/१/२०१४ रोजीची अंतिम जेष्ठतायादी प्रसिध्द करणेबाबत...

संदर्भ : १.या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४-४/आस्था/जे.सु.१४/५३०१, दि. २४/२/२०१४.
२.या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४-४/आस्था/जे.सु.१४/५३१९, दि. २६/२/२०१४.
३.या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४-४/आस्था/जे.सु.१४/२५८, दि. २४/४/२०१४.

आपले लक्ष संदर्भीय पत्राकडे वेधण्यात येत आहे. या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भ क्र. ३ चे पत्रान्वये पहारेकरी या संवर्गाची दि. १/१/२०१४ रोजीची प्राथमिक जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आली होती.

सदरील प्राथमिक जेष्ठता यादीवर संबंधीतानी कोणत्याही प्रकारचे आक्षेप नोंदविलेले नसल्याने, तसेच (महासंचालक,कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल / उपवनसंरक्षक, सातारा / विभागीय वन अधिकारी, सांगली / सामाजिक वनीकरण विभाग, सातारा वगळून) कोणत्याही विभागाकडून कोणत्याही प्रकारे आक्षेप / त्रृटीबाबत अहवाल या कार्यालयास प्राप्त न झाल्याने, पहारेकरी संवर्गाची दि. १/१/२०१४ रोजीची जेष्ठता यादी अंतीम स्वरूपात प्रसिध्द करण्यात येत आहे. ती आपले विभागातील संबंधीत कर्मचारी यांचे निदर्शनास तात्काळ आणुन द्यावी. जेष्ठतेबाबत कुठलेही प्रकरण उद्भवल्यास त्यास आपले कार्यालय जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. सदर जेष्ठतायादी या कार्यालयाचे संकेतस्थळ www.kolhapurforest.co.in यावर प्रसिध्द करणेत आली आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

(एम.के.राव)
मुख्य वनसंरक्षक(प्रा.), कोल्हापूर.

प्रतिलिपी : विभागीय वन अधिकारी, रत्नागिरी (चिपळूण) यांना सहपत्रासह माहितीसाठी अग्रेषित.

प्रतिलिपी : श्री.ना.ल.माळवी, पहारेकरी निर्देशन विभाग, कोल्हापूर यांना सहपत्रासह माहितीसाठी..

सोबत : वरीलप्रमाणे

(एम.के.राव)
मुख्य वनसंरक्षक(प्रा.), कोल्हापूर.